क्विंटल शेणाचे कुजलेजे खत मिसळून जमीन तयार करायला पाहिजे.

**प्रवर्धन** - कोरफड़चे प्रवर्धन लहान कंदापासुन, बलबिल्स द्वारे केलेया जाऊ शकते. हे बलबिल्स कोरफडची शेती करण्यारे शेतकरी / किंवा संशोधन संस्थेतून प्राप्त केल्या जाऊशकतात.

**सिंचन** - कोरफड़च्या शेतीसाठी सिंचनाची आवश्यकता जवळ - जवळ लागत नाही. आवश्यकतेनुसार वेळो-वेळी हलका हलका पाण्याचा पुरवठा करू शकतो.

**निदंणी-खुरपणी** - रोपणांच्या महिन्याभरानंतर निदंणी-खुरपणी केली पाहिजे, म्हणजे तण-गवत पीकाच्या वाढ़ीवर विपरीत प्रभाव टाकणार नाही. त्यानंतर वेळो-वेळी आवश्यकते प्रमाणे निदंणी-खुरपणी केली पाहिजे.

**रोग व नियंत्रण** - सहसा यावर कोणत्याही प्रकार चे रोग व कीड चा प्रभाव पडत नाही, पण कीडीचा प्रादुर्भाव आढळल्यास उचित जैव कीटनाशका ची फवारणी सल्ला करून केली पाहिजे. जनावरांच्या जाण्या-येण्या मुळे तुटण्या चा नुकसान सोडला तर जनावरे ह्यांना खाऊन नुकसान करत नाही।

**दोहन व संग्रहण** - कमीत कमी एक वर्ष किंवा १५ महिन्याच्या वयाचे रोपे कापणीसाठी परिपक्व होतात. रोप लावण्याचा एका वर्षानंतर प्रत्येक तीन महिन्यानंतर प्रत्येक रोपाची ३-४ पाने सोडून उरलेले सगळे परिपक्व पानांना तेज धार असलेल्या चाकुने/विळ्यानि किंवा पावशीने कापून एकत्र करायला पाहिजे. पानांचे एकत्रीकरण व साठवण करत्यावेळी पानांची कमीत कमी क्षती झाली पाहिजे, ही काळजी घ्यावी.

**उत्पादन व उत्पन्न** - कोरफड़च्या शेतीत वर्षभरात जवळ-जवळ ४५० ते ५०० क्विंटल मांसल ताजी पानं प्रति एकरच्या दराने प्राप्त होतात.

**बाजार भाव** - कोरफड़च्या पानांचे बाजार भावामध्ये वेळोवेळी चढ-उतार येत असतो. वर्तमान बाजार भाव ३-६ रूपये प्रति किलोग्राम पर्यंत आहे. कोरफड़ाच्या शेतीमध्ये आवड असणा-या शेतक-याला याची विपणन व्यवस्थे बद्दल माहिती एकत्र करायला पाहिजे. जर विपणन ची व्यवस्था शेती करण्याच्या ठिकाणापासुन अत्यंत दूर अंतरावर असेल तर याचा पानांचे परिवहनांमध्ये अडचण येते व खर्च पण अधिक होते, त्या मुळे शेतकऱ्याला आपल्या पीकाचा बाजारभाव बरोबर मिळत नाही. कोरफडच्या एका एकराच्या शेतीपासुन जवळ-जवळ रूपये ४५,०००/- चा खर्च होते व जवळ-जवळ रूपये १,५०,०००/- मिळवण्याची शक्यता आहे. ह्याप्रकारे शेतकरी जवळ-जवळ रूपये १,००,०००/- प्रती एकर चा लाभ कमवत घेऊकरू शकता.


संकलन व संपादन

डॉ. ए.के. पाण्डे

अनुवादक

संजय पौनीकर व डा. नितिन कुलकर्णी

वन कीट प्रभाग, उ.व.अ.सं., जबलपुर

अधिक जानकारी के लिये संपके करें

निदेशक

उष्णकटिबंधीय वन अनुसंधान संस्थान

पो.आ. - आर.एफ.आर.सी., मण्डला रोड, जबलपुर - 482021

फोन : 0761-2840483, 4044002

वन विस्तार प्रभाग

उष्णकटिबंधीय वन अनुसंधान संस्थान

पो.आ. - आर.एफ.आर.सी., मण्डला रोड, जबलपुर - 482021

फोन : 0761-2840627


Amrit Offset # 2413943

# कोरफड

## *Aloe vera*




उष्णकटिबंधीय वन अनुसंधान संस्थान

(भारतीय वानिकी अनुसंधान एवं शिक्षा परिषद)

डाकघर - आर.एफ.आर.सी., मण्डला रोड,

जबलपुर - 482 021 (म.प्र.)

## ओळख -

कोरफड लिलियेसी (Liliaceae) कुळातील एक महत्वाची औषधीय प्रजाति आहे. ह्याचे वनस्पतिशास्त्रीय नाव *ऐलो वेरा* (Aloe Vera) असे आहे. हा उत्तरी अमेरिका आणि स्पेन चा पादप आहे. हा भारतातच नव्हे तर संपूर्ण जगा मधे एलॉए (Aloe) च्या नावाने फारच प्रसिद्ध आहे. कोरफड हा एक शुष्क किंवा मरूप्रदेशात आढळणारा मरूदभिद् (Xerophytic) पादप आहे, व संपूर्ण भारतामध्ये नैसर्गिक रूपात आढळतो. भारता शिवाय हा यूरोप, उत्तरी अमेरिका, स्पेन, थाइलैंड, चाइना, वेस्ट इंडीज इत्यादि देशांमध्ये पण आढळतो.

ही पादप प्रजाति संस्कृत भाषेमध्ये घृतकुमारी; हिन्दी मध्ये ग्वारपाठा; घीकुऑर; गुजराती मध्ये कुंवारपाठा; बंगलामध्ये घृतकुमारी; मराठी मध्ये कोरफड; पंजाबी मध्ये कुंवारमंदल; तेलगु मध्ये पिन्नगोरिष्ट कलवन्द; मळयालम मध्ये कुमारी; कन्नड मध्ये लोधीसर आणि इंग्रजी मध्ये ऐलो वेरा (Aloe Vera) इत्यादि अनेक भाषेत जन सामान्य मध्ये प्रचलित आहे.

कोरफड ही एक बहुवर्षीय, मासेलयुक्त १ ते ३ फूट उंच भालाकार, कण्टकित, धारदार पानांनी युक्त प्रजाति आहे. पाने जाड मांसल असून पानांमध्ये पाणी तुपा सारख्या रसाच्या रूपात साठवलेलं असतं. पाने लांबट असून खोडाभोवती गोलाकार वाहाढतात. पानांची लांबी ४५ ते ६० से.मी. असून रूंदी ५ ते ७ से.मी. असते. पानाच्या कडांना काटे असतात. पानांमध्ये बुळबुळीत व पारदर्शक गर असतो मोठया बयाच्या पादपांच्या मध्य भागे तून निधालेव्या लालसर दांडी वर हलके पिवळे किवां केशरी फुलं जानेवारी – फेब्रुवारी महिन्यात निधतात.

## औषधी उपयोग :

हा तिक्त (कडूवा), कटू ज्वरांशी संबंधित रोग, जळणे व कपलेल्या अंगा वर थंडावा देतो. सौंदर्य प्रसांधनाचा निमार्ण करण्यामधे यांचा उपयोग होतो. पानाचा जेल क्रिम च्यारूपात, चेहऱ्यावरचा त्वचेला साफ, मुलायम करण्यासाठी व मुरमाला (कील मुंहासे) ठीक करण्यासाठी उपयोगात येतो. पानांमध्ये जवळ-जवळ ९४ टक्के पाणी व उरलेल्या भागात अमीनो ऐसिड व कार्बोहाइड्रेट्स असतात. कोरफड मध्ये एलोन नावाचा ग्लूकोसाइड समूह मोठया प्रमाणात आढळतो- याचा मुख्य घटक बार्बेलाइन किंवा बारबोलिन नावाचा हलका पिवळेया रंगाचा स्फटकीय ग्लूकोसाइड असतो. याचंबरोबर ह्याचामध्ये आइसोबारबोलीन, ऐलोइमोटीन, गैलिक अम्ल, राळ आणि एक सुगंधित तेल पण आढळतो. याचात विघमान तेल असल्यामुळेच याची गंधाची विशेषता आहे. कोरफडच्या पानाचा रस व गूदा (जेल) व रोपांचा मुळांना अग्निमाघ, त्वचेचे रोग, अग्निदग्ध, उदरशूळ कृमिघ्न, रक्तशोधक, महिलांचा होणारे रोगांवर उपचारासाठी प्रयोगात आणले जाते. डोकेदुखी, फोडांचा जखमा, सूजन आणि गाठांवर मुरळ आल्यावर किंवा खोलवर झालेल्या जखमा, नेत्ररोग, रक्त परिभ्रमणत्र प्लिहा वाढणे, बवासीर, खोकल्यांचा रोगांचा उपचारामध्ये अति प्रभावकारी औषधींच्या रूपात सुद्धा काम करते.

शरीरात पौष्टिकता प्रक्रिया संबंधी विकारांच्या पुनर्स्थापनेसाठी यांचे पान अत्यंत लाभकारी आहे. पानांना भाजून ह्याचे रस मदाबरोबर (शहद) घेतल्यावर कोणत्याही प्रकारचा खोकल्याला आराम मिळतो. एका पानाचे ताजे गिर दैनंदिन रूपात घेतल्यास वात, कटिवात व सांध्याचा (Joints) दुखण्यावर फारच आराम मिळतो. ह्यांच्या पानांपासुन प्राप्त जेल (गूदा) लहान मुलांच्या आतड्यांमध्ये झालेल्या कीड/कृमि करता घरगुती उपचार आहे. याचा गूदा त्वचा/शरीरांचे जळलेले जखमा व दुखण्यावर अचूक उपाय आहे. जळलेल्या जखमांवर याचे ताजे रस गारव्या बरोबर स्निग्धता व जखमांचे डाग लवकर स्वच्छ करण्यास मदत करते. पुरातन काळापासुन याचा उपयोग सलादाच्या रूपात केल्या जात असे. याचा प्रयोग खादय पदार्थ जसे-मठरी, पोळी, लाडू, हलवा, शरबत, अर्क इत्यादि पदार्थ बनविण्यात केला जातो. हे व्यंजन राजस्थान मध्ये अत्यंत लोकप्रिय आहे.

## कृषि तंत्रज्ञान :

**जमीन व हवामान** - कोरफड ची लागवड करण्यासाठी सिंचन व असिंचन दोन्ही प्रकाराची जमीन उपयुक्त असते, परंतु असिंचन प्रकारची जमीन ह्याचा लागवणीसाठी अधिक उपयोगी आहे. कोरफडच्या लागवणीसाठी चांगल्या पाणी निचराची जमीन उपयुक्त मानली जाते. ज्या जमीन मध्ये पाणी थांबतं अश्या जमीनीत रोपांचे मुळे सड़ण्याची भीती असते. सहसा कोरफडची शेतीसाठी कोणतेही जैविक सुरक्षा, खत किंवा कीटनाशकांची आवश्यकता पडत नाही.

**शेतीची तयारी** - कोरफडच्या लागवणीसाठी तयार केलेल्या शेताला २-३ वेळा खोलवर नांगरणी व वखरणी करून लागवणीसाठी तयार केले पाहिजे. यानंतर आवश्यकते प्रमाणे प्रति एकड़ जवळ-जवळ ८-१०